दादा भगवान प्ररूपित

# भोगतो त्याची चूक



आपल्याला जे काही दुःख भोगावे लागत आहे,
ते आपण केलेल्या चुकांचाच परिणाम आहे.



Marathi

दादा भगवान प्ररूपित

# भोगतो त्याची चूक

मूळ गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन

अनुवाद : महात्मागण

**प्रकाशक** : अजीत सी. पटेल
दादा भगवान विज्ञान फाउंडेशन
1, वरूण अपार्टमेंट, 37, श्रीमाळी सोसायटी,
नवरंगपुरा पुलिस स्टेशनच्या समोर,
नवरंगपुरा, अहमदाबाद - 380009,
Gujarat, India.
**फोन :** +91 79 3500 2100

© Dada Bhagwan Foundation,
5, Mamta Park Society, B\h. Navgujarat College,
Usmanpura, Ahmedabad - 380014, Gujarat, India.
**Email :** info@dadabhagwan.org
**Tel :** + 91 79 3500 2100

**All Rights Reserved. No part of this publication may be shared, copied, translated or reproduced in any form (including electronic storage or audio recording) without written permission from the holder of the copyright. This publication is licensed for your personal use only.**

**प्रथम आवृत्ति** : 1000 सप्टेंबर, 2007
**रीप्रिंट** : 22000 फेब्रुवारी, 2009 ते ऑगस्ट, 2017
**नवी रीप्रिंट** : 5000 एप्रिल, 2022

**भाव मूल्य** : 'परम विनय' आणि
'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

**द्रव्य मूल्य** : 15 रुपये

**मुद्रक** : अंबा मल्टीप्रिंट
B-99, इलेक्ट्रॉनिक्स GIDC,
क-6 रोड, सेक्टर-25,
गांधीनगर-382044.
Gujarat, India.
**फोन :** +91 79 3500 2142

**ISBN/eISBN** : 978-93-86289-81-0

Printed in India

# त्रिमंत्र





नमो अरिहंताणं
नमो सिद्धाणं
नमो आयरियाणं
नमो उवज्झायाणं
नमो लोए सव्वसाहूणं
एसो पंच नमुक्कारो
सव्व पावप्पणासणो
मंगलाणं च सव्वेसिं
पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥
ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥
ॐ नमः शिवाय ॥ ३ ॥
जय सच्चिदानंद





## दादा भगवान कोण?

जून 1958 संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रूपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरूपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्‌भुत आश्चर्य! एका तासात त्यांना विश्वदर्शन लाभले! मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवित आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षूनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्‌भुत ज्ञान प्रयोगाद्वारे! त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर 'ए.एम. पटेल' आहेत. आम्ही ज्ञानी पुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोकाचे' नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! मी स्वत: भगवान नाही. माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

## आत्मज्ञान प्राप्तीची प्रत्यक्ष लींक

परम पूज्य दादा भगवान (दादाश्री) यांना 1958 मध्ये आत्मज्ञान प्रकट झाले. त्यानंतर 1962 ते 1988 पर्यंत देश-विदेश परिभ्रमण करून मुमुक्षुंना सत्संग आणि आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत.

दादाश्रींनी आपल्या हयातीतच आत्मज्ञानी पूज्य डॉ. नीरूबहन अमीन (नीरूमा) यांना आत्मज्ञान प्राप्त करवून देण्याची ज्ञानसिद्धी प्रदान केली होती. दादाश्रींच्या देहविलयानंतर नीरूमा त्यांच्याप्रमाणेच मुमुक्षुंना सत्संग व आत्मज्ञान प्राप्ती निमित्त भावाने करवित असत.

आत्मज्ञानी पूज्य दीपकभाई देसाई यांना सुद्धा दादाश्रींनी सत्संग करण्याची सिद्धी प्रदान केली होती. वर्तमानात पूज्य नीरूमांच्या आशीर्वादाने पूज्य दीपकभाई देश-विदेशात निमित्तभावाने आत्मज्ञान प्राप्ती करवित आहेत.

या आत्मज्ञान प्राप्तीनंतर हजारो मुमुक्षु संसारात राहून, सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असताना सुद्धा आतून मुक्त राहून आत्मरमणतेचा अनुभव घेत आहेत.

# निवेदन

ज्ञानी पुरुष संपूज्य दादा भगवान यांच्या श्रीमुखातून अध्यात्म आणि व्यवहारज्ञानासंबंधित जी वाणी निघाली, तिला रेकॉर्ड करून संकलन व संपादन करून पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित केले जात आहे. विभिन्न विषयांवर निघालेल्या सरस्वतीचे अद्‌भुत संकलन ह्या पुस्तकात झाले आहे, जे नवीन वाचकांसाठी वरदान रूप सिद्ध होईल.

प्रस्तुत अनुवादामध्ये असे विशेष ध्यान ठेवलेले आहे की प्रत्येक वाचकाला दादाश्रींची प्रत्यक्ष वाणीच ऐकली जात आहे असा अनुभव व्हावा. याच कारणाने कदाचित काही ठिकाणी अनुवादाची वाक्य रचना मराठी व्याकरणानुसार त्रुटीपूर्ण जाणवेल, परंतु तिथे जर आशय समजून वाचण्यात आले तर अधिक लाभदायी होईल.

प्रस्तुत पुस्तकात काही ठिकाणी कंसात दर्शविलेले शब्द किंवा वाक्य दादाश्रींद्वारा बोलल्या गेलेल्या वाक्यांना अधिक स्पष्टतापूर्वक समजावण्यासाठी लिहिले गेले आहेत. तसेच काही ठिकाणी इंग्रजी शब्दांना मराठी अर्थाच्या रूपात ठेवले गेले आहेत. दादाश्रींच्या श्रीमुखातून निघालेले काही शब्द जसेच्या तसेच *इटालिक्स* मध्ये ठेवलेले आहेत, कारण त्या शब्दांसाठी मराठी भाषेत असे शब्द नाहीत की जे त्याचा पूर्ण अर्थ देऊ शकतील. तरी पण त्या शब्दांचे समानर्थी शब्द कंसात तसेच पुस्तकाच्या शेवटी पण दिले गेले आहेत.

ज्ञानींच्या वाणीला मराठी भाषेत यथार्थ रूपाने अनुवादित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु दादाश्रींच्या आत्मज्ञानाचा आशय जसा आहे तसा तर आपल्याला गुजराती भाषेतच अवगत होईल. ज्यांना ज्ञानाचा गहन अर्थ समजून घ्यायचा असेल, ज्ञानाचे खरे मर्म समजायचे असेल त्यांनी ह्या हेतूने गुजराती भाषा शिकावी असा आमचा अनुरोध आहे. अनुवादासंबंधी उणीवांबद्दल आपले क्षमा प्रार्थी आहोत.

# संपादकीय

जेव्हा कोणत्याही प्रकारची चूक नसतानाही आपल्याला दुःख सहन करावे लागते, तेव्हा हृदय सतत आक्रोश करून म्हणत असते की, ह्यात माझी काय चूक? ह्यात मी काय चुकीचे केले? तरीही उत्तर मिळत नाही, तेव्हा आपल्या आत बसलेला वकील जागा होतो आणि म्हणतो ह्यात माझी काहीच चूक नाही. ह्यात तर समोरच्याचीच चूक आहे ना? शेवटी असे मान्य करून, जस्टीफाय करतात की, 'पण त्याने जर असे केले नसते, तर मला असे वाईट करावे किंवा बोलावे लागले असते का?' अशा प्रकारे स्वतःची चूक झाकून समोरच्याचीच चूक आहे, असे सिद्ध करतो. आणि कर्मबंधनाची श्रृंखला चालू राहते.

परम पूज्य दादाश्रींनी अगदी सामान्य माणसालाही सर्व प्रकारे समाधान होईल, असे एक जीवनोपयोगी सूत्र दिले, 'भोगतो त्याची चूक'. ह्या जगात चूक कोणाची? चोराची की ज्याची वस्तू चोरली गेली त्याची? ह्या दोघात कोणाला भोगावे लागते? ज्याचे चोरीला गेले, त्यालाच भोगावे लागते ना? जो भोगतो त्याची चूक! चोर तर जेव्हा पकडला जाईल तेव्हा भोगेल, तेव्हा त्याला त्याच्या चुकीबद्दल शिक्षा होईल. परंतु आज स्वतःच्या चुकीचा दंड मिळाला. स्वतःच भोगतो, मग कोणाला दोष द्यायचा? मग समोरचा निर्दोषच दिसेल. आपल्या हातून टी-सेट (कप-बशा) फुटला तर कोणाला दोष देणार? आणि जर नोकराकडून फुटला तर? असे आहे हे. घरात, व्यापारात, नोकरीत सगळीकडे 'चूक कोणाची आहे?' हे जर शोधायचे असले तर तपास करावा की ह्यात 'कोणाला भोगावे लागत आहे?' त्याचीच चूक. चूक आहे तोपर्यंतच भोगावे लागते. जेव्हा चूक संपेल, तेव्हा ह्या जगातील कोणतीही व्यक्ती, कोणताही संयोग आपल्याला भोगवटा (दुःख) देऊ शकणार नाही.

प्रस्तुत संकलनात दादाश्रींनी जो 'भोगतो त्याची चूक' याचे विज्ञान उघड केले आहे, हे सूत्र उपयोगात आणल्याने आपल्या सर्व समस्यांचे समाधान मिळेल, असे हे अमूल्य ज्ञानसूत्र आहे!

**-डॉ. नीरूबहन अमीन**

# भोगतो त्याची चूक

## निसर्गाच्या न्यायालयात...

ह्या जगाचे न्यायाधीश ठिकठिकाणी आहेत, परंतु कर्म जगाचा नैसर्गिक न्यायाधीश तर एकच आहे, जो 'भोगतो त्याची चूक' हा एकच न्याय आहे. ज्यामुळे संपूर्ण जग चालत आहे आणि भ्रांतीच्या न्यायाने हा संपूर्ण संसार उभा आहे.

एक क्षणसुद्धा जग न्यायाबाहेर चालत नाही. ज्याला बक्षिस द्यायचे असेल, त्याला बक्षिस देते. दंड द्यायचा असेल, त्याला दंड देते. परंतु न्यायाबाहेर चालत नाही. न्यायातच आहे, संपूर्ण न्यायसंगतच आहे. परंतु समोरच्या व्यक्तीच्या दृष्टीस हे पडत नाही, त्यामुळे त्याला समजत नाही. जेव्हा दृष्टी निर्मळ होईल, तेव्हा न्याय दिसेल. जोपर्यंत स्वार्थदृष्टी असेल तोपर्यंत न्याय कसा दिसेल?

## ब्रह्मांडाच्या स्वामीने का भोगावे?

हे संपूर्ण जग 'आपल्या' मालकीचे आहे. आपण 'स्वत:' ब्रह्मांडाचे मालक आहोत. तरीही आपल्याला दु:ख का म्हणून भोगावे लागते, हे शोधून काढा ना? हे तर आपण आपल्या चुकांमुळे बांधले गेलो आहोत, लोकांनी आपल्याला बांधलेले नाही. ह्या चुका संपल्या की आपण मुक्त, खरे तर आपण मुक्तच आहोत. परंतु चुकांमुळे बंधन भोगतो आहोत.

स्वत:च न्यायाधीश, स्वत:च गुन्हेगार आणि स्वत:च वकील, मग तो न्याय कोणाच्या बाजूने करेल? स्वत:च्या बाजूनेच ना! आपल्या

सोयीनुसारच न्याय करणार ना? तो स्वतः निरंतर चुकाच करीत राहतो, त्यामुळे जीव नेहमी बंधनात अडकून राहतो. आतील न्यायाधीश म्हणतो की तुमची चूक झाली आहे, पण मग आतला वकील वकीली करत राहतो की यात माझा काय दोष? त्यामुळे मग स्वतःच बंधनात येतो. स्वतःच्या आत्महितासाठी हे समजून घ्यायला हवे की कोणाच्या दोषामुळे हे बंधन आहे? जो भोगतो त्याचाच दोष. लोकभाषेत सांगायचे तर हा अन्याय आहे, परंतु परमेश्वराच्या भाषेचा न्याय तर असेच म्हणतो की, 'जो भोगतो त्याची चूक' ह्या न्यायात तर बाहेरच्या न्यायाधीशाचे कामच नाही.

जगाच्या वास्तविकतेचे रहस्यज्ञान लोकांच्या दृष्टीतच नाही आणि ज्याच्यामुळे सतत भटकावे लागते, त्या अज्ञान-ज्ञानाची तर सर्वांना माहिती आहे. तुमचा खिसा कापला, यात चूक कोणाची? त्याचा खिसा नाही कापला आणि तुमचाच का कापला? तुम्हा दोघांपैकी, सध्या कोण भोगत आहे? जो 'भोगतो त्याची चूक!' 'दादां'नी ज्ञानात 'जसे आहे तसे' पाहिले की भोगतो त्याचीच चूक आहे.

## सहन करायचे की सामावून घ्यायचे?

लोक सहनशक्ती वाढविण्याचे म्हणतात पण ती कुठपर्यंत राहील? ज्ञानाची दोरी तर थेटपर्यंत पोहोचते. सहनशक्तीची दोरी कुठपर्यंत पोहोचणार? सहनशक्तीची मर्यादा असते. ज्ञान अमर्यादित असते. हे 'ज्ञान'च असे आहे की किंचितमात्र सहन करावे लागत नाही. सहन करणे म्हणजे लोखंडाला डोळ्यांनी पाहून वितळून टाकणे. त्यासाठी शक्ती हवी, परंतु ज्ञानाने किंचितही सहन केल्याशिवाय परमानंदासह मुक्ती! आणि मग हेही लक्षात येते की हा तर हिशोब पूर्ण होत आहे, आणि आपण मुक्त होत आहोत.

जो दुःख भोगतो, ती त्याची चूक आणि सुख भोगतो ते त्याचे बक्षिस. परंतु भ्रांतीचा कायदा निमित्तला पकडतो. परमेश्वराचा कायदा-

रियल (खरा) कायदा, तो तर ज्याची चूक असेल, त्यालाच पकडणार. हा कायदा एक्झॅक्ट आहे आणि त्यात कोणीही बदल करू शकत नाही. जगात असा कोणताही कायदा नाही की जो कोणाला दु:ख देऊ शकेल. सरकारचा कायदा सुद्धा दु:ख देऊ शकत नाही!

हा चहाचा कप जर तुमच्या हातून फुटला तर काय तुम्हाला दु:ख होते? स्वत: हाताने फुटला तर सहन करावे लागते का? आणि तो जर तुमच्या मुलाच्या हातून फुटला तर दु:ख, चिंता व संताप होतो. हे सर्व स्वत:च्याच चुकांचा हिशोब आहे असे जर समजले, तर दु:ख किंवा चिंता होईल का? परंतु हे तर दुसऱ्यांचा दोष बघून दु:ख आणि चिंता ओढवून घेतात, रात्रंदिवस चिडचिड करीत राहतात. आणि पुन्हा स्वत:ला असे वाटते की, मला खूप सहन करावे लागत आहे.

स्वत:ची काही चूक असेल तेव्हाच समोरचा काही बोलेल ना? म्हणून चूक संपवून टाका ना! ह्या जगात कोणताही जीव कुठल्याही जीवाला त्रास देऊ शकत नाही, असे स्वतंत्र जग आहे, आणि जर कुणी त्रास देत असेल तर त्याचे कारण पूर्वी आपण काही दोष केला आहे. तेव्हा आता चूक संपवा, म्हणजे त्याचा हिशोब राहणार नाही.

**प्रश्नकर्ता :** ही थियरी बरोबर समजली तर मनात सर्व प्रश्नांचे समाधान राहील.

**दादाश्री :** समाधान नाही, एक्झॅक्ट तसेच आहे. हे जुळवून काढलेले नाही, बुद्धीपूर्वकची गोष्ट नाही, हे ज्ञानपूर्वकचे आहे.

## आजचा गुन्हेगार-लुटणारा की लुटला जाणारा?

वर्तमानपत्रात रोज येते की, 'आज टॅक्सीत दोन माणसांनी एकाला लुटले, अमुक फ्लॅटच्या बाईसाहेबांना बांधून लुटले.' हे वाचून आपण घाबरायची गरज नाही की मी देखील लुटलो गेलो तर? असा विकल्प करणे हाच गुन्हा आहे. त्यापेक्षा तू निश्चिंत होऊन जा ना! तुझा हिशोब

असेल तर तो घेऊन जाईल. नाही तर कोणी बापही विचारणारा नाही. म्हणून तू निर्भय होऊन जा. हे वर्तमानपत्रवाले तर लिहितच असतात, म्हणून काय आपण घाबरून जायचे? हे तर आपल्याकडे घटस्फोटाचे प्रमाण अजून कमी आहे म्हणून ठीक आहे, परंतु जर जास्त प्रमाणात घटस्फोट व्हायला लागले, तर सर्वांना शंका होत राहील की आपलाही घटस्फोट झाला तर? एक लाख माणसे ज्या जागी लुटले जातात तिथेही तुम्हाला घाबरायची गरज नाही.

लुटणारा भोगतो की जो लुटला गेला तो भोगतो? कोण भोगतो ते पाहून घ्यावे. कोणी लुटारु भेटला आणि त्याने लुटून नेले, मग आता रडायचे नाही, आपली वाटचाल पुढे चालू ठेवायची!

जग दुःख भोगण्यासाठी नाही, सुख भोगण्यासाठी आहे. ज्याचा जेवढा हिशोब असेल तेवढे मिळते. कित्येक जण केवळ सुखच उपभोगत असतात. ते कशामुळे? कित्येक जण फक्त दुःखच भोगत आहेत, ते कशामुळे? त्यांनी तसा हिशोब सोबत आणलेला आहे, म्हणून.

'भोगतो त्याची चूक' हे एकच सूत्र घरच्या भिंतीवर लिहून ठेवले असेल तर मग भोगत असताना हे सहज लक्षात येईल की ही चूक कोणाची आहे? म्हणून कित्येक घरात, मोठ्या अक्षरात भिंतीवर लिहून ठेवलेले असते की 'भोगतो त्याची चूक'. मग ही गोष्ट विसरणारच नाही ना!

जर कोणी आयुष्यभर हे सूत्र यथार्थपणे समजून वापरले, तर मग त्याला गुरु करायची आवश्यकता नाही, आणि हे सूत्रच त्याला मोक्षाप्रत घेऊन जाईल असे आहे.

## अजब वेल्डिंग झाली, ही!

'भोगतो त्याची चूक', हे तर खूप मोठे सूत्र आहे. संयोगानुसार, काही काळाच्या हिशोबाने शब्दांची वेल्डिंग (योग्य सांगड) होत असते.

वेल्डिंग झाल्याशिवाय उपयोगाला येणार नाही ना! वेल्डिंग व्हायला हवी. हे शब्द वेल्डिंग केलेलेच आहेत. ह्यावर तर एक मोठे पुस्तक लिहिले जाईल, एवढे सार यात सामावले आहे!

'भोगतो त्याची चूक' एवढेच जरी समजले, तर एका बाजूचे संपूर्ण कोडे सुटते आणि दुसरीकडे 'व्यवस्थित शक्ती' समजल्यावर दुसऱ्या बाजूचे कोडे सुद्धा सुटते. स्वत:ला जे दु:ख भोगावे लागत आहे, त्यात स्वत:चाच दोष आहे, इतर कोणाचाही दोष नाही. जो दु:ख देतो, त्याची चूक नाही. दु:ख देतो त्याची चूक संसारात आणि 'जो भोगतो त्याची चूक' हे परमेश्वरी कायद्यात.

**प्रश्नकर्ता :** दु:ख देणाऱ्याला सुद्धा भोगावे तर लागते ना?

**दादाश्री :** नंतर तो जेव्हा भोगणार तेव्हा त्याची चूक मानली जाईल. परंतु आज तर तुमचीच चूक पकडली गेली.

## चूक, वडीलांची की मुलाची?

एक बाप आहे, त्याचा मुलगा रात्री दोन वाजता घरी येतो. तशी पन्नास लाखाची पार्टी, एकूलता एक मुलगा! बाप वाट पाहात राहतो की मुलगा आला की नाही? आणि जेव्हा मुलगा येतो तो झोकांड्या खात खातच घरात शिरतो. बाप पाच-सात वेळा सांगायला जातो तेव्हा तो बापावरच ओरडतो. त्यामुळे बाप मागे फिरतो. मग तुमच्यासारखे म्हणतात, 'जाऊ द्या ना, सोडा त्याला, तुम्ही आपले शांतपणे झोपा.' तर बाप म्हणेल, 'मुलगा तर माझा ना?' जसा काही त्याच्या कुशीतून जन्माला आला आहे!

तो मुलगा तर येऊन झोपतो. मग मी त्यांना विचारले 'मुलगा झोपून गेल्यानंतर तरी तुम्ही झोपता की नाही?' तेव्हा बाप म्हणतो 'मला झोप कशी येणार? हा गधडा दारु पिऊन झोपून जातो. मी काय त्याच्यासारखा मूर्ख आहे?' मी म्हणालो 'तो तर शहाणा आहे' त्याला

त्याचे काही दु:ख होत आहे का? त्यानंतर मी त्यांना म्हटले 'जो भोगतो त्याची चूक' तो भोगतोय की तुम्ही भोगत आहात? तेव्हा ते म्हणाले 'भोग तर मीच भोगतोय! संपूर्ण रात्र जागत राहतो...' मी म्हणालो त्याची चूक नाही, ही तर तुमचीच चूक आहे. तुम्ही मागच्या जन्मात त्याला बिघडविले होते, त्याचा हा परिणाम आला आहे. तुम्ही त्याला बिघडविले, म्हणून ह्या जन्मी तो माल तुम्हाला परत करायला आला आहे. ही दुसरी तीन मुले चांगली आहेत, त्याचा आनंद तू का घेत नाही? ह्या सर्व अडचणी आपणच निर्माण केल्या आहेत. नीट समजून घेण्यासारखे आहे हे जग!

त्या म्हाताऱ्याच्या बिघडलेल्या मुलाला मी एक दिवस विचारले, 'अरे, तुझ्या वडीलांना तुझ्या वागण्याने खूप दु:ख होते आणि तुला त्याबद्दल काहीच दु:ख वाटत नाही?' तर तो म्हणतो कसा, 'मला कसले आले आहे दु:ख? वडील खूप पैसा कमावून बसले आहेत, तेव्हा मला कसली चिंता? मी तर मजा करतोय.'

म्हणजे ह्या बाप आणि मुलगा, या दोघांमध्ये कोण भोगतोय? तर बापच. म्हणून बापाचीच चूक. 'भोगतो त्याची चूक.' हा मुलगा जुगार खेळत असेल, वाटेल ते करीत असेल, पण तरी त्याचे भाऊ तर आरामात झोपले आहेत ना? त्याची आई पण निवांत झोपली आहे! आणि हा कमनशीबी म्हातारा एकटाच जागत असतो? म्हणून त्याची चूक. त्याची चूक कोणती? तर ह्या म्हाताऱ्याने ह्या मुलाला मागच्या जन्मी बिघडविले होते. त्या मागच्या जन्माचे असे ऋणानुबंध बांधले गेले आहेत, म्हणून ह्या जन्मी म्हाताऱ्याला असे भोग भोगावे लागतात. मुलाची चूक जेव्हा पकडली जाईल, तेव्हा मुलगा भोगेल. आज दोघांपैकी त्रास कोणाला होत आहे? ज्याला त्रास होतो, त्याचीच चूक. हा एकच कायदा समजून घेतला तर संपूर्ण मोक्षमार्ग मोकळा होईल!

मग त्या बापाला मी समजावले. आता तो नीट वागेल यासाठी

मार्ग काढायला हवा. कसेही करून त्याला फायदा होईल, त्याचे नुकसान होणार नाही, असे काहीतरी करत जा. मानसिक त्रास करून घ्यायचा नाही. त्याच्यासाठी शारीरिक श्रम, वगैरे सर्व करायचे. आपल्याजवळ पैसे असतील तर द्यावे, पण मानसिक त्रास करून घ्यायचा नाही.

नाहीतरी आपल्या येथे कोणता नियम आहे? 'भोगतो त्याची चूक.' मुलगा दारु पिऊन आला आणि आरामात झोपून गेला आणि तुम्हाला रात्रभर झोप लागत नाही. तेव्हा तुम्ही मला म्हणाल, की 'हा गाढवासारखा झोपलाय, आणि मला तर झोप लागतच नाही.' तर मी म्हणेन अरे, तुम्ही भोगत आहात म्हणून ती तुमची चूक. तो भोगेल तेव्हा त्याची चूक.

**प्रश्नकर्ता :** आई-वडील भोगतात, ते तर ममता आणि जबाबदारीमुळे भोगतात ना?

**दादाश्री :** फक्त ममता आणि जबाबदारी नाही, परंतु त्याचे मुख्य कारण त्यांची चूक आहे. ममतेशिवाय दुसरी पण अनेक कारणे असतात, परंतु तुम्ही भोगता म्हणजे चूक तुमचीच आहे. तेव्हा आता कोणाचेही दोष पाहू नका, नाहीतर पुन्हा पुढच्या जन्माचा हिशोब बांधला जाईल!

अर्थात दोघांचे कायदे वेगवेगळे आहेत. निसर्गाच्या कायद्याला मान्य कराल तर तुमचा मार्ग अगदी सरळ होईल. आणि सरकारच्या कायद्याला मान्य कराल तर गोंधळून जाल.

**प्रश्नकर्ता :** पण दादा त्याला त्याची चूक लक्षात यायला हवीना?

**दादाश्री :** नाही, त्याच्या लक्षात येणार नाही. ती चूक दाखविणारा हवा. आणि तो त्याचा विश्वासनीयही असायला हवा. एकदा जर त्याला स्वत:ची चूक दिसली, की मग दोन-तीन वेळेनंतर त्याला अनुभवात येईल.

म्हणूनच आम्ही सांगितले होते की, जर समजले नाही तर घरात

एवढे लिहून ठेवा की 'जो भोगतो त्याची चूक.' सासू तुम्हाला खूप त्रास देत असेल, रात्री तुम्हाला झोप लागत नसेल, आणि तेव्हा जर सासूला पाहायला गेलो तर ती निवांत झोपलेली असते, अगदी घोरत असते, आता हे पाहून तरी आपल्याला समजायला हवे ना, की चूक आपलीच आहे. सासू तर आरामात झोपून गेली. 'भोगतो त्याची चूक' तुम्हाला ही गोष्ट आवडली की नाही? 'भोगतो त्याची चूक' एवढेच जरी समजले तरी घरात एकही भांडण होणार नाही.

प्रथम जीवन जगायला शिका. घरात भांडणे कमी होतील, मग दुसरी गोष्ट शिकायची!

## समोरच्याला समजत नसेल?

**प्रश्नकर्ता :** कित्येक जण असे असतात की आपण कितीही चांगले वागलो तरी ते आपल्याला समजून घेत नाहीत.

**दादाश्री :** ते जर समजून घेत नसतील तर त्यात आपलीच चूक आहे. आपल्याला समजदार व्यक्ती का नाही भेटली? त्याच्याशीच आपली गाठ का पडली? जेव्हा जेव्हा आपल्याला काही भोगावे लागते, ते सर्व आपल्याच चुकांचाच परिणाम असतो.

**प्रश्नकर्ता :** तर मग आपण असे समजायचे की माझी कर्मेच अशी आहेत?

**दादाश्री :** नक्कीच. आपल्या स्वतःच्या चुकीशिवाय आपल्याला भोगावे लागतच नाही. ह्या जगात असा कोणीही नाही जो आपल्याला किंचितमात्र दुःख देऊ शकेल आणि जर कोणी दुःख देणारा आहे, तर तो आपल्याच चुकीमुळे आहे. समोरच्याचा दोष नाही, तो केवळ निमित्त आहे. म्हणून जो भोगतो त्याची चूक.

पति-पत्नी आपसात खूप भांडत असतील आणि जेव्हा दोघे

झोपायला गेल्यानंतर आपण गुपचुप पाहायला गेलो तर ती बाई बिनधास्त झोपलेली असते आणि तो भाऊ सारखा कूस बदलत असतो, तर आपण समजून जायचे की यात पतीचीच चूक आहे, कारण ती बाई तर भोगत नाही. ज्याची चूक असेल, तोच भोगतो. आणि जर त्यावेळेला तो भाऊ झोपलेला असेल आणि ती बाई जागी असेल, तर समजावे की त्या बाईचीच चूक आहे. 'भोगतो त्याची चूक', हे तर फार गुह्य विज्ञान आहे! सारे जग निमित्तालाच दोष देत असते.

## याचा न्याय कोणता?

हे जग नियमाच्या आधीन चालते, ही वस्तुस्थिती आहे. ह्या जगाचे 'रेग्यूलेटर ऑफ द वर्ल्ड' पण आहे जे निरंतर ह्या जगाला रेग्यूलेशन (नियम)मध्येच ठेवत असते.

बस स्टँडवर कुणी बाई उभी आहे. आता बस स्टँडवर उभे राहणे हा काही गुन्हा तर नाही ना? एवढ्यात एका बाजूनी एक बस येते, त्या बस ड्रायव्हरच्या हातून स्टीयरिंगवरचा ताबा सुटतो आणि बस फूटपाथवर चढते व त्या बाईला चिरडून टाकते, तेथे पाचशे माणसांचा समूह गोळा होतो. आता त्या लोकांना जर सांगितले की 'याचा न्याय करा', तर लोक म्हणतील, 'बिचारी ती बाई काही चूक नसताना मेली. ह्यात बाईचा काय दोष? हा ड्रायव्हर नालायक आहे.' त्यानंतर चार-पाच हुशार माणसे असेही म्हणतील, 'हे असे कसले बस ड्रायव्हर, ह्यांना तर तुरुंगातच घातले पाहिजे. बाई बस स्टँडवर उभी होती त्यात त्या बिचारीचा काय गुन्हा?' अरे, तिचा गुन्हा तुम्हाला माहीत नाही. तिचा गुन्हा होता, म्हणूनच तर ती मेली. आणि ह्या ड्रायव्हरचा गुन्हा केव्हा ठरेल, तर जेव्हा तो पकडला जाईल व त्याच्यावर केस होऊन कोर्टात गुन्हा सिद्ध होईल तेव्हाच. आता तेव्हाही तो जर अपराधी ठरला, तर अपराधी, अन्यथा त्याला निरपराधी म्हणून सोडून देतील आणि या बाईचा गुन्हा आज पकडला गेला. अरे, हिशोबाशिवाय कोण बरे मारील? त्या

बाईने मागचा हिशोब आज चुकता केला. असे समजूनच घ्यायचे की त्या बाईला भोगावे लागले म्हणजे तिचीच चूक. नंतर तो ड्रायव्हर जेव्हा पकडला जाईल, तेव्हा ड्रायव्हरची चूक. आज जो पकडला गेला, तो गुन्हेगार.

आता बरेच लोक असेही म्हणतील की जर परमेश्वर असता तर असे घडलेच नसते. म्हणून या जगात परमेश्वर आहे असे वाटतच नाही. त्या बाईचा काय गुन्हा होता? परमेश्वर ह्या जगात नाहीच! बघा ना! ह्या लोकांनी कसा निष्कर्ष काढला! अरे, असे का बरे म्हणता? परमेश्वराबद्दल वाईट का बोलता? परमेश्वराला त्याचे घर रिकामे करायला का लावता? परमेश्वराचे घर रिकामे करायला निघालात! अहो, हा परमेश्वर नसला, तर राहिलेच काय ह्या जगात? ह्या लोकांना वाटते की परमेश्वराची सत्ता राहिली नाही. अशाने लोकांचा देवावरचा विश्वास उडून जातो. अरे, पण असे नाही. हे सर्व आपापले हिशोब आहेत. हा फक्त एका जन्माचा हिशोब नाही. आज त्या बाईची चूक पकडली गेली, म्हणून तिला भोगावे लागले. हा सर्व न्यायच आहे. ती बाई चिरडली गेली हा न्यायच झाला आहे. तात्पर्य हे जग नियमसहित आहे. थोडक्यात हेच सांगायचे आहे.

जर का ड्रायव्हरची चूक असती तर सरकारचा कडक कायदा असता, एवढा कडक की त्या माणसाला तिथल्या तिथे उभे करून गोळ्या झाडून ठार केले असते. पण तसे करण्याची परवानगी तर सरकारही देत नाही. कारण असे कोणाला मारून टाकू शकत नाही. वास्तवात तो गुन्हेगार नाही, पण त्याने परत हा नवीन गुन्हा केला आहे, तो गुन्हा तर तो ड्रायव्हर नंतर भोगेल परंतु आज त्याने तुम्हाला तुमच्या गुन्ह्यातून मुक्त केले. तुम्ही गुन्ह्यातून मुक्त झालात. आणि तो गुन्ह्याने बांधला गेला. म्हणून आपण त्याला सद्बुद्धी द्यायला सांगितले की तू गुन्ह्यात अडकू नकोस.

## ॲक्सिडन्ट म्हणजे तर...

ह्या कलियुगात ॲक्सिडन्ट (दुर्घटना) आणि इन्सिडंट (घटना) असे घडतात की मनुष्य गोंधळून जातो. ॲक्सिडन्ट म्हणजे काय? टु मेनी कॉजेस एट ए टाईम (असंख्य कारणे एकाच वेळी) आणि घटना म्हणजे काय? सो मेनी कॉजेस एट ए टाईम (बरीच कारणे एकाच वेळी), म्हणूनच आम्ही सांगतो की 'भोगतो त्याची चूक' आणि तो जेव्हा पकडला जाईल तेव्हा त्याची चूक मानली जाईल!

हे तर, जो पकडला गेला त्याला चोर म्हणतात. जसे ऑफिसमधून ज्या एकाला पकडले त्याला चोर मानतात, पण म्हणून काही ऑफिसमध्ये इतर कुणी चोर नाही?

**प्रश्नकर्ता :** सगळेच आहेत.

**दादाश्री :** पकडले जात नाहीत तोपर्यंत ते सावकार. निसर्गाचा न्याय तर कोणी उघड केलाच नाही. किती सरळ आणि सोपा आहे! पूर्ण समाधान होईल असा! शोर्टकट! 'भोगतो त्याची चूक' हे एकच वाक्य नीट समजल्याने संसाराचे ओझे बऱ्याच प्रमाणात कमी होते.

परमेश्वराचा कायदा तर काय म्हणतो की ज्या क्षेत्रात, ज्या काळात, जो भोगतो, तो स्वतःच गुन्हेगार आहे. तिथे कोणालाही, वकीलालाही विचारण्याची आवश्यकता नाही. आता कोणाचा खिसा कापला गेला तर त्या कापणाऱ्यासाठी तर ती आनंदाची गोष्ट आहे, तो तर मजेत जिलेबी खात असेल, हॉटेलात बसून चहा-नाश्ता करीत असेल. आणि त्याचवेळी ज्याचा खिसा कापला गेला तो दुःख भोगत असेल. म्हणून जो भोगतो त्याची चूक. त्याने पूर्वी कधीतरी चोरी केली असेल, म्हणून आज तो पकडला गेला, आणि खिसा कापणारा तर जेव्हा पकडला जाईल, तेव्हा त्याला चोर म्हटले जाईल.

मी कधी तुमची चूक शोधत बसणारच नाही. संपूर्ण जग

समोरच्याचीच चूक पाहत असते. भोगत असतो स्वत: पण चूक मात्र समोरच्याचीच पाहत असतो. त्यामुळे तर उलट गुन्हे दुप्पट होत राहतात आणि व्यवहारातील गुंतागुंतही वाढत जाते. ही गोष्ट समजली तर गुंता सुटत जाईल.

## मोरबीला पूर आला, काय कारण?

मोरबी शहरात पूर आला आणि जे काही झाले, ते कोणी केले? शोधून काढा बरे? कोणी केले हे?

म्हणून आम्ही गोष्ट लिहिली आहे की ह्या जगात चूक कोणाची आहे? स्वत:ला समजण्यासाठी या एका वस्तूला दोन पद्धतीने समजून घ्यायला हवे. त्रास भोगणाऱ्याने 'भोगतो त्याची चूक', ही गोष्ट समजून घ्यायची आणि पाहाणाऱ्याने 'मी त्याला मदत करू शकत नाही, पण मी (त्याला) मदत करायला हवी', असे समजायला हवे.

ह्या जगाचा नियम असा आहे की जे डोळ्यांनी दिसेल, त्यालाच चूक म्हणतात. याउलट निसर्गाचा नियम असा आहे की जो भोगत आहे, त्याची चूक.

## परिणाम होतो, तिथे ज्ञान आहे की बुद्धी?

**प्रश्नकर्ता :** वर्तमानपत्रात वाचले की, औरंगाबादला असे झाले, मोरबीला असे झाले तर आपल्यावर त्याचा परिणाम होतो, परंतु जर वाचल्यानंतर काहीच परिणाम होत नसेल, तर काय ती जडता म्हणायची?

**दादाश्री :** परिणाम होत नाही, त्यालाच ज्ञान म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** आणि परिणाम होतो त्याला काय म्हणतात?

**दादाश्री :** ती बुद्धी. त्यालाच संसार म्हणतात. बुद्धीने मनुष्य इमोशनल (भावनिक) होतो. पण प्रत्यक्षात त्याचा काही उपयोग नसतो.

लढाईच्या वेळी पाकीस्तानवाले इथे बॉम्ब टाकण्यासाठी येत होते,

लोक जेव्हा ती बातमी पेपरात वाचत की त्या तिथे बॉम्ब पडला, तर इथे त्यांना भिती वाटायची. हे सर्व परिणाम घडवून आणते, ती त्यांची बुद्धी आहे. आणि ही बुद्धीच संसार उभा करते. ज्ञान मात्र परिणामांपासून मुक्त ठेवते. पेपर वाचला तरी पण परिणाम होत नाही. परिणाम मुक्त म्हणजे आपल्याला काही स्पर्शतच नाही. आपल्याला तर फक्त जाणायचे व पहायचेच आहे.

ह्या वर्तमानपत्राचे काय करायचे? तर जाणायचे आणि पाहायचे, बस! जाणणे म्हणजे पूर्ण सविस्तर लिहिले असेल, त्याला जाणणे म्हणतात, आणि जर सविस्तर नसेल, तेव्हा त्याला पाहिले म्हणतात, यात कोणाचाही दोष नाही.

**प्रश्नकर्ता :** काळाचा दोष तर आहे ना?

**दादाश्री :** काळाचा दोष कसला? जो भोगतो त्याची चूक काळ तर बदलतच राहणार ना? चांगल्या काळात आपण नव्हतो का? चोवीस तीर्थंकर होते, तेव्हा आपण नव्हतो का?

**प्रश्नकर्ता :** होतो.

**दादाश्री :** तर त्यावेळी आपण चटणी खाण्यात (विषयविकारामध्ये) मग्न होतो. त्याला काळ तरी काय करणार बिचारा? काळ तर आपोआप येतच राहणार ना! दिवसा जरी काम केले नाही तरी रात्र येऊन उभी राहते की नाही?

**प्रश्नकर्ता :** राहते.

**दादाश्री :** मग रात्री दोन वाजता कोणाला चणे आणायला पाठविले, तर दुप्पट पैसे देऊनही कोणी चणे देईल का?

## लोकांना वाटते, हा उलटा न्याय

आता एक सायकलवाला जात आहे, तो बरोबर डाव्या बाजूने

जात आहे आणि एक स्कूटरवाला विरुद्ध दिशेने म्हणजे चुकीच्या बाजूने आला आणि सायकलवाल्याचा पाय मोडून टाकला. आता कोणाला भोगावे लागले?

**प्रश्नकर्ता :** सायकलवाल्याला, ज्याचा पाय मोडला त्याला.

**दादाश्री :** हो, ह्या दोघात आज कोणाला भोगणे आले? ज्याचा पाय मोडला त्याला. स्कूटरवाल्याच्या निमित्ताने मागचा हिशोब चुकता झाला. स्कूटरवाल्याला आज काहीच दुःख नाही. तो तर जेव्हा पकडला जाईल तेव्हा त्याचा गुन्हा सिद्ध होईल. पण आज मात्र जो 'भोगतो त्याची चूक'.

**प्रश्नकर्ता :** ज्याला लागले त्याचा काय गुन्हा?

**दादाश्री :** त्याचाच गुन्हा, त्याच्या मागच्या जन्मीचा जो हिशोब होता, तो आज पूर्ण झाला. हिशोबाशिवाय कोणाला कोणतेही दुःख भोगावे लागत नाही. ही त्याची हिशोब भरपाई करण्याची वेळ आली म्हणून तो पकडला गेला. नाहीतर एवढ्या मोठ्या दुनियेत दुसरा कोणी का पकडला गेला नाही. तुम्ही निर्भय होऊन कसे फिरू शकता? तर म्हणतात, 'आपला हिशोब असेल तर होईल, हिशोब नसेल तर काय होणार आहे?' असे म्हणतात ना लोक?

**प्रश्नकर्ता :** आपल्याला भोगावे लागणार नाही, यासाठी उपाय काय?

**दादाश्री :** मोक्षाला जायचे. कोणाला किंचितमात्र दुःख द्यायचे नाही. कोणी आपल्याला दुःख दिले, ते आपण जमा करून टाकले तर आपले वहीखाते चोख होतील. आता नवीन कोणाला द्यायचे नाही, नवीन व्यापार सुरू करायचा नाही, आणि जो जुना हिशोब बाकी आहे तो फेडून टाकायचा, म्हणजे तो हिशोब पूर्ण होईल.

**प्रश्नकर्ता :** तर ज्याचा पाय मोडला आहे, त्या भोगत असलेल्या

माणसाने असे समजायचे की ही माझीच चूक आहे, आणि म्हणून त्याने त्या स्कूटरवाल्या विरुद्ध काहीच कार्यवाही करायची नाही?

**दादाश्री :** काहीच करायचे नाही, असे नाही. आम्ही काय सांगतो की मानसिक परिणाम बदलायला नकोत. व्यवहारात जे होत असेल, ते होऊ द्या, पण मानसिक राग-द्वेष व्हायला नको. 'ज्याला माझी चूक आहे', असे समजते, त्याला राग-द्वेष होणार नाही.

व्यवहारात आपल्याला पोलीसवाला विचारेल की आपले नाव सांगा तेव्हा आपण सांगायला हवे. सगळा व्यवहार करावा लागेल, परंतु ड्रॅमॅटिक-नाटकीय रित्या, राग-द्वेष करायचे नाहीत. आपल्याला 'आपली चूक आहे' असे समजल्यानंतर त्या बिचाऱ्या स्कूटरवाल्याचा काय दोष? हे जग तर उघड्या डोळ्यांनी पाहत आहे, म्हणून त्याला पुरावे तर द्यावेच लागतील. परंतु आपल्याला स्कूटरवाल्यावर राग-द्वेष व्हायला नको. कारण त्याची चूक नाहीच. आपण जो आरोप करतो की ती 'त्याचीच चूक आहे', तुमच्या दृष्टीने तो अन्याय दिसतो. पण वास्तवात तुमच्या दृष्टीत फरक असल्यामुळे तुम्हाला अन्याय दिसतो.

**प्रश्नकर्ता :** बरोबर आहे.

**दादाश्री :** कोणी तुम्हाला दुःख देत असेल तर ती त्याची चूक नाही. परंतु जर तुम्ही दुःख भोगत असाल, तर ती तुमची चूक आहे. हा निसर्गाचा कायदा आहे. आणि जगाचा कायदा कोणता? तर जो दुःख देतो, त्याची चूक.

ही सूक्ष्म गोष्ट समजली तर सर्व स्पष्ट होईल ना! आणि तेव्हाच माणसाचे समाधान होते.

## उपकारी, कर्मापासून मुक्ती देणारा

सूनेच्या मनात असे घर करून बसलेले असते की माझी सासू मला त्रास देते. तर हे रात्रंदिवस तिच्या लक्षात राहील की विसरुन जाईल?

**प्रश्नकर्ता :** लक्षात राहील.

**दादाश्री :** रात्रंदिवस लक्षातच असते. म्हणून मग शरीरावर त्याचा विपरीत परिणाम होतो. मग दुसऱ्या चांगल्या गोष्टीही तिला दिसणार नाहीत. म्हणून आम्ही तिला काय समजावतो की हिला चांगली सासू मिळाली, तिलाही चांगली सासू मिळाली आणि तुलाच का अशी सासू मिळाली? हा तुझा मागच्या जन्मीचा हिशोब आहे, तो चुकता कर. तो कशा प्रकारे चुकता करायचा तेही तिला सांगतो, जेणे करून ती सुखी होईल. कारण दोषी तिची सासू नाही, जो भोगतो त्याची चूक आहे. म्हणजे मग समोरील व्यक्तीचा दोष दिसत नाही.

जगात दोष कोणाचाच नाही. दोष काढणाऱ्याचा दोष आहे. जगात दोषी कुणीच नाही. सारे जण आपापल्या कर्माच्या उदयाने आहे. जे कोणी भोगत आहेत, तो काही आजचा गुन्हा नाही. हे सारे मागच्या जन्मीच्या कर्माचे फलित आहे. आज तर त्याला पश्चाताप होत असेल, परंतु पूर्वी करार झाले आहे त्याचे काय? तो करार पूर्ण केल्याशिवाय गत्यंतरच नाही.

ह्या जगात जर तुम्हाला कधी कोणाची चूक शोधून काढायची असेल तर, 'जो भोगतो त्याची चूक आहे.' सून सासूला दुःख देते किंवा सासू सूनेला दुःख देते, ह्यात कोणाला भोगावे लागत आहे? सासूला. तर सासूची चूक आहे. सासू सूनेला दुःख देत असेल, तर सूनेने हे गृहीतच धरायला हवे की ह्यात माझीच चूक आहे. ह्या दादाजींच्या ज्ञानाच्या आधाराने समजून घ्यायला हवे की, माझी चूक असेल म्हणूनच ती शिव्या देत आहे. म्हणून सासूचा दोष पाहू नये. सासूचा दोष पाहिल्याने गुंता वाढत जातो, कॉम्पलेक्स होत जातो, आणि सासूला सून त्रास देत असेल तर सासूने दादाजींच्या ज्ञानाच्या आधारे समजून घ्यायला हवे की भोगतो त्याची चूक. त्यामुळे मलाच निभावून न्यायला हवे.

सासू सूनेशी भांडली असेल, तरीसुद्धा सून मजेत असेल आणि सासूलाच भोगावे लागले, तेव्हा चूक सासूचीच! तुम्ही जावेला डिवचले आणि तुम्हाला भोगावे लागले तर ती तुमचीच चूक आणि तुम्ही असे काही केले नसेल तरीही ती भांडायला आली, तर ते मागच्या जन्मीचे काही हिशोब बाकी असेल, त्याची तिने वसुली केली. मग तेव्हा तुम्ही पुन्हा चूक करू नका, नाहीतर पुन्हा भोगावे लागेल! अर्थात सुटका करून घ्यायची असेल तर जे जे काही कडू-गोड येईल (शिव्या वगैरे) ते जमा करून टाका, म्हणजे तुमचा हिशोब पूर्ण होईल. ह्या जगात हिशोबाशिवाय नजरेस नजरही मिळत नाही, तर काय बाकी सगळे हिशोबाशिवाय होत असेल? तुम्ही ज्यांना ज्यांना जेवढे जेवढे दिले असेल तेवढे सर्व ते तुम्हाला परत देतील. तेव्हा तुम्ही खुश होऊन जमा करून टाका, आणि म्हणा बरे झाले! आता माझा हिशोब चुकता होईल! नाहीतर पुन्हा जर चूक कराल तर पुन्हा भोगावे लागेलच!

आम्ही 'भोगतो त्याची चूक' हे सूत्र प्रकाशित केले आहे. लोकांना खूप आश्चर्य वाटते की, खरे संशोधन आहे हे!

## गियरमध्ये बोट, कोणाची चूक

जो कडवटपणा भोगतो, तोच कर्ता. कर्ता तोच विकल्प. एखादी मशिनरी जरी तुम्ही स्वतःच तयार केली असेल व त्यात गियर व्हील असेल, आणि त्यात जर तुमचे स्वतःचे बोट आले, तर त्या मशीनला तुम्ही लाख वेळा जरी सांगितले की, 'बाबा रे, हे माझे बोट आहे, मी स्वतः तुला तयार केले आहे, तर ते गियर व्हील काय तुमचे बोट सोडून देईल?' नाही सोडणार. मशीन तर तुम्हाला समजावते की भाऊ, ह्यात माझा काय दोष? तू भोगत आहेस म्हणून तुझीच चूक. त्याचप्रमाणे बाहेरही सर्व 'मशिनरी'च आहेत. ही सर्व माणसे गियरच आहेत, गियर नसते तर संपूर्ण मुंबई शहरात कोणत्याही पत्नीने आपल्या पतीला दुःख दिले नसते आणि कोणत्याही पतीने आपल्या पत्नीला दुःख दिले नसते.

आपले घर तर सगळेच सुखी ठेवतील, पण असे घडत नाही. ही मुले, पति-पत्नी हे सर्व केवळ 'मशिनरी'च आहेत, 'गियर'च आहेत.

## डोंगराला उलट दगड माराल का?

**प्रश्नकर्ता :** आपल्याला कोणी दगड मारला आणि त्यामुळे आपल्याला इजा झाली तर खूप उद्वेग होतो.

**दादाश्री :** इजा होते म्हणून उद्वेग होतो, नाही का? आणि जर डोंगरावरुन दगड घरंगळत येऊन डोक्यावर पडला व रक्त निघाले तर?

**प्रश्नकर्ता :** अशा परिस्थितीत, कर्माच्या फलित म्हणून आपल्याला ते लागणार होते म्हणून लागले, असे मानतो.

**दादाश्री :** पण मग त्या डोंगराला शिव्या देणार नाही? त्याच्यावर रागावणार नाही?

**प्रश्नकर्ता :** त्यात रागवण्याचे काही कारण राहत नाही, कारण हे सारे कोणी केले, त्याला आपण ओळखत नाही.

**दादाश्री :** का, तेथे बरा शहाणपणा सुचतो? किती सहजपणे शहाणपणा येतो! असे हे सारे डोंगरच आहेत. जे दगड फेकत असतात, शिव्या देत असतात, चोरी करत असतात, हे सर्व डोंगरच आहेत चेतन नाहीत. हे जर समजले तर आपले काम सुकर होईल.

कोणी गुन्हेगार दिसतो, ते तुमच्या आत बसलेले जे शत्रू आहेत, क्रोध-मान-माया-लोभ, ते असे दाखवितात. स्वतःच्या दृष्टीने ने तो गुन्हेगार दिसत नाही, हे तर क्रोध-मान-माया-लोभ दाखवितात. ज्याला क्रोध-मान-माया-लोभ नाही, त्याला कोणी गुन्हेगार दाखविणाराच नसतो ना! आणि त्याला कोणी गुन्हेगार दिसतही नाही. वास्तवात कोणीही गुन्हेगार नाहीच. हे तर क्रोध-मान-माया-लोभ घुसले आहेत आणि 'मी चंदुभाऊ आहे' असे आपण मानत असल्यामुळे ते ठाण मांडून आहेत.

'मी चंदुभाऊ आहे' (वाचकांनी येथे स्वत:चे नाव समजायचे) ही मान्यता निघून गेली की क्रोध-मान-माया-लोभ निघून जातील. परंतु घर रिकामे करायला त्यांना थोडा वेळ लागेल, कारण बऱ्याच दिवसांपासून ठाण मांडून जे बसले आहेत!

## ही तर संस्कारी पद्धत

**प्रश्नकर्ता :** एक तर तो स्वतः दु:ख भोगत आहे, आता तो स्वत:च्या चुकीमुळे दु:ख भोगत आहे. तिथे मग इतर लोक दीड शहाणे बनून विचारायला येतात. 'अरे, काय झाले, काय झाले?' पण त्यांचा यात काय संबंध? तो त्याच्या चुकीमुळे भोगत आहे, तुम्ही काही त्याचे दु:ख घेऊ शकणार नाही.

**दादाश्री :** असे आहे की, जे विचारपूस करायला येतात, भेटायला येतात, ते त्यांच्या फार उच्च संस्कारांमुळे येतात. विचारपूस करायची म्हणजे काय? तर तेथे जाऊन त्या माणसाला विचारायचे, 'कसे आहात भाऊ? आता तुम्हाला कसे वाटते?' तेव्हा तो म्हणतो, 'बरे आहे आता.' त्याला वाटते 'ओहोहो.... माझी एवढी मोठी व्हॅल्यू! इतके सारे लोक मला भेटायला येतात!' त्यामुळे तो आपले दु:ख विसरुन जातो.

## गुणाकार-भागाकार

एकंदरीत काय, तर बेरीज वजाबाकी, हे दोन्ही नेचरल एडजेस्टमेन्टस् आहेत. आणि गुणाकार-भागाकार हे माणूस स्वत:च्या बुद्धीने करीत राहतो. म्हणजे रात्री झोपताना मनात विचार करतो की येथील सर्व प्लॉट फार महाग झाले आहेत, म्हणून त्या तिथे जे स्वस्त आहेत ते मी विकत घेणार. मनात तो असे गुणाकार करत असतो. म्हणजे सुखाचा गुणाकार करतो, आणि दु:खाचा भागाकार करतो. तो सुखाचा गुणाकार करतो म्हणून पुन्हा त्याला भयंकर दु:ख प्राप्त होते. आणि दु:खाचा भागाकार करतो तरी पण दु:ख कमी होत नाही! सुखाचा

गुणाकार करतात की नाही ? असे झाले तर चांगले, असे झाले तर उत्तम, करतो की नाही ? आणि ही बेरीज-वजाबाकी होत आहे, दिस इज नेचरल एडजस्टमेंट (ही एक नैसर्गिक व्यवस्था) आहे. जर दोनशे रुपये हरवले किंवा व्यापारात पाच हजाराचे नुकसान झाले, ही नेचरल एडजेस्टमेन्ट आहे, कोणी आपला खिसा कापून दोन हजार रुपये घेऊन गेला, ती सुद्धा नेचरल एडजेस्टमेन्ट आहे! 'भोगतो त्याची चूक' हे आम्ही ज्ञानदृष्टीने पाहून गॅरंटीने सांगतो.

**प्रश्नकर्ता :** असे म्हणतात की सुखाचा गुणाकार करतो, ह्यात चुकीचे काय आहे ?

**दादाश्री :** गुणाकार करायचे असतील तर दुःखाचे करा. सुखाचे कराल तर खूप मोठ्या संकटात सापडाल. गुणाकार करण्याची आवड असेल तर दुःखाचा करा. मी जर एखाद्या माणसाला थोबाडीत मारली, आणि त्याने मला दोन थोबाडीत मारल्या ते चांगले झाले, असा आणखी कोणी मारणारा भेटला तर चांगले. अशी समजूत ठेवल्याने आपले ज्ञान वाढत जाते. परंतु जर दुःखाचा गुणाकार जमत नसेल तर नका करू पण सुखाचा गुणाकार मात्र करूच नका.

## झालो परमेश्वराचे गुन्हेगार

'भोगतो त्याची चूक' ही परमेश्वराची भाषा! आणि येथे तर ज्याने चोरी केली, त्याला लोक गुन्हेगार समजतात. कोर्ट देखील चोरी करतो त्यालाच गुन्हेगार समजते.

म्हणून ह्या बाहेरच्या गुन्ह्यांना थांबविण्यासाठी लोकांनी आतले गुन्हे चालू केले. ज्यामुळे आपण परमेश्वराचे गुन्हेगार ठरु, असे गुन्हे चालू केले. अरे वेड्या, परमेश्वराचे गुन्हेगार होऊ नकोस. इथे गुन्हे झाले तर काही हरकत नाही. दोन महिने जेलमध्ये राहून परत येता येईल. परंतु परमेश्वराचा गुन्हेगार तू होऊ नकोस. तुम्हाला नीट समजले का

हे? ही अतिशय सूक्ष्म गोष्ट आहे, ही गोष्ट जर समजलात तर तुमचे काम झालेच समजा. 'भोगतो त्याची चूक', हे आता पुष्कळ लोकांना समजले आहे. कारण हे सर्वजण काही साधे भोळे आहेत का? खूप विचारशील लोक आहेत. आपण त्यांना एकदा समजावून सांगितले आहे! आता जर सून सासूला सतत दु:ख देत असेल आणि सासूनी हे एकच सूत्र ऐकले असेल की 'भोगतो त्याची चूक', त्यामुळे सून जेव्हा जेव्हा तिला दु:ख देईल तेव्हा ती त्वरीत समजून जाईल की ही माझीच चूक असणार, म्हणूनच ती दु:ख देते ना! तेव्हा त्याचे निराकरण होईल. नाहीतर योग्य निराकरण होणार नाही आणि वैर वाढत जाईल.

## समजणे अवघड, तरी वास्तविकता

दुसऱ्या कोणाची चूक नाही. जी काही चूक आहे ती चूक आपलीच आहे. आपल्या चुकीमुळे हे सारे उभे राहिले आहे. ह्याचा आधार काय? तेव्हा असेच म्हणावे लागेल की 'आपलीच चूक.'

**प्रश्नकर्ता :** उशीरा का होईना, पण लक्षात येत आहे.

**दादाश्री :** उशीरा समजते तेही चांगलेच म्हणावे. एका बाजूने गात्र (शरीर) शिथिल होत जातात, आणि मग हे समजायला लागते, त्याचे तर कामच झाले ना! पण शरीर मजबूत असतानाच जर हे सारे समजले असते तर?

आम्ही 'भोगतो त्याची चूक' हे सूत्र दिले आहे ना, ते सर्व शास्त्रांचे सार दिले आहे. तुम्ही मुंबईला गेलात तर हजारो घरात मोठ्या अक्षरात 'भोगतो त्याची चूक' लिहिलेले असते. हातातून काचेचा ग्लास पडतो त्यावेळी सगळी मुले पाहत असतात आणि आईला म्हणतात 'अग आई, तुझीच चूक आहे', मुले पण समजून जातात, बरे का! मुलगा आईला म्हणतो, 'तुझा चेहरा उतरलेला आहे, म्हणून तुझीच चूक आहे.' कढी खारट झाली म्हणजे आपण निरखत राहायचे की कोणाचा चेहरा

उतरला आहे. हो, त्याचीच चूक. वरण सांडले तर पाहायचे कोणाचे तोंड कावरे बावरे होत आहे? त्याचीच चूक. भाजी तिखट झाली की आपण सर्वांच्या तोंडाकडे बघायचे, कोणाचे तोंड बिघडलेले आहे? तर त्याचीच चूक आहे ती. ही चूक कोणाची? 'भोगतो त्याची चूक.'

समोरच्या व्यक्तीचे तोंड तुम्हाला रुसलेले दिसले तर त्यात चूक तुमची. तेव्हा त्याच्या 'शुद्धात्म्याला' स्मरून त्याच्या नावाने माफी मागत राहिल्याने ऋणानुबंधातून सुटता येते.

पत्नीने तुमच्या डोळ्यात औषध टाकले आणि तुमचे डोळे दुखले, तर ती चूक तुमची. जो सहन करतो त्याची चूक. असे 'वीतराग भगवंत' सांगतात आणि हे लोक तर निमित्तालाच चावायला धावतात!

स्वतःच्या चुकीमुळेच मार खातात. ज्याने दगड मारला त्याची चूक नाही, पण ज्याला दगड लागला त्याची चूक! तुमच्या आजूबाजूची मुले वाटेल तशा चुका किंवा दुष्कृत्य करत असतील, पण तुमच्यावर त्याचा परिणाम होत नसेल, तर ती तुमची चूक नाही, परंतु जर तुमच्यावर परिणाम झाला तर ती तुमची चूक आहे, हे नक्कीच समजून जावे!

## जमा-उधारीची नवीन रीत

चंदुभाऊ आणि लक्ष्मीचंद ही दोन माणसे एकत्र आली आणि चंदुने लक्ष्मीचंद वर आरोप केला की तुम्ही माझ्याशी वाईट वागलात. तर लक्ष्मीचंदला रात्री झोप लागणार नाही, आणि चंदुभाऊ रात्री आरामात झोपला असेल. म्हणजे चूक लक्ष्मीचंदचीच. परंतु दादांचे सूत्र 'भोगतो त्याची चूक' हे जर त्याच्या लक्षात आले तर लक्ष्मीचंदही निवांत झोपून जाईल, अन्यथा त्याला भरपूर शिव्या देत राहील!

आपण एकदा सुलेमानला पैसे उधार दिले असतील आणि मग सहा महिन्यांपर्यंत सुलेमानने पैसे परत केले नाही, तर? अरे, पैसे दिले कोणी? तुझ्या अहंकाराने. त्याने तुझ्या अहंकाराला पोषण दिले, आणि

तू दयाळू होऊन त्याला पैसे दिलेस, तेव्हा आता सुलेमानच्या खाती जमा कर आणि अहंकारच्या खात्यात उधार ठेव.

## असे पृथक्करण तर करा

ज्याचा जास्त दोष, तोच ह्या जगात मार खातो. मार कोण खातो? ते पाहून घ्यावे. जो मार खातो, तोच दोषी आहे.

जो भोगतो त्यावरुन हिशोब निघतो की, त्याची किती चूक होती. घरात दहा माणसे असतील, त्यातील दोघा जणांना घर कसे चालत असेल याचा विचारसुद्धा येत नाही, त्यातील दोघा जणांना घरात मदत करावी, असा विचार येतो. दोघे-तिघे जण घर चालवायला मदत करतात. एक तर दिवसभर घर कसे चालवावे त्याच चिंतेत राहतो. आणि बाकीचे दोघे जण मात्र आरामात झोपून जातात. तर चूक कोणाची? अरे वेड्या, जो भोगतो त्याचीच, चिंता करत राहतो त्याचीच. जे आरामात झोपतात, त्यांना काहीच दु:ख नाही.

चूक कोणाची आहे? तर कोण भोगत आहे, याचा तपास करा. नोकराच्या हातून दहा ग्लास फुटले तर त्याचा परिणाम घरातील माणसांवर होणार की नाही? आता घरातील माणसांमध्ये मुलेतर काही भोगत नाहीत पण त्यांचे आई-वडील मात्र चिडत राहतात. त्यातही आई थोड्यावेळाने निवांत झोपेल परंतु त्यांचे वडील हिशोब करीत राहतात. दहा गुणिले पाच, पन्नास रुपयांचे नुकसान झाले. तो जास्त एलर्ट आहे म्हणून जास्त दु:ख भोगेल. 'भोगतो त्याची चूक.'

आपल्याला चुकांना शोधायला जायची गरज नाही. मोठ्या न्यायाधीशांना आणि वकीलांना शोधायला जायचीही गरज नाही. त्यापेक्षा हे सूत्र दिले आहे ना, हेच थर्मोमीटर की 'भोगतो त्याची चूक'. जर कोणी एवढे पृथक्करण करीत करीत पुढे जात राहिला तर तो सरळ मोक्षाला पोहोचेल.

## चूक, डॉक्टरची की रोग्याची?

डॉक्टरांनी रोग्याला इंजेक्शन दिले, नंतर डॉक्टर घरी जाऊन आरामात झोपून गेले, आणि रोग्याला तर इंजेक्शन रात्रभर दुखत राहिले, ह्यात चूक कोणाची? रोग्याची! आणि डॉक्टर तर जेव्हा भोगेल तेव्हा त्याची चूक पकडली जाईल.

लहान मुलीसाठी डॉक्टरांना घरी बोलविले, डॉक्टरांनी येऊन पाहिले तर तिची नाडी चालत नव्हती. तेव्हा डॉक्टर काय म्हणतो? मला कशासाठी बोलावले? अरे, जेव्हा तुम्ही हात लावला त्याचवेळी ती गेली. नाहीतर नाडी तर चालत होती. तरी पण डॉक्टर रागावतो आणि वरुन व्हिजीट फीचे शंभर रुपये पण घेऊन जातो. अरे! रागावायचे असेल तर पैसे घेऊ नकोस ना, आणि जर पैसे घेत असशील, तर रागवू नकोस. पण नाही, फी तर घ्यायचीच ना? पैसे तर द्यावेच लागतात. असे हे जग आहे. म्हणून ह्या काळात न्याय शोधू नका!

**प्रश्नकर्ता :** असे पण घडते की माझ्याकडून औषध घेतात आणि वरुन मलाच रागावतात.

**दादाश्री :** हो, असेही घडते, पण तरी समोरच्या व्यक्तीला गुन्हेगार समजाल, तर तुम्ही गुन्हेगार ठराल. आता निसर्ग न्यायच करीत आहे.

ऑपरेशन करतांना पेशंट मरुन गेला तर चूक कोणाची?

चिकट मातीत बूट घालून फिरताना जर पडलात, तर दोष कोणाचा? वेड्या तुझाच! तुला एवढे समजत नाही की अनवाणी पायाने फिरलो तर बोटे मातीत रुतणार आणि आपण पडणार नाही! ह्यात दोष कोणाचा? मातीचा, बुटाचा की तुझा? भोगतो त्याची चूक. एवढे जर पूर्णपणे समजलात तर तुम्ही मोक्षाला जाल. जे दुसऱ्यांची चूक पाहतात ते साफ चुकीचे आहे. स्वतःच्या चुकीमुळे निमित्त भेटतो. आता इथे जिवंत निमित्त भेटला तर सारे त्याला चावायला धावतात. पण मग काटा लागला

तर काय कराल? भर चौकात काटा पडलेला आहे, हजारो माणसे तेथून जातात, कोणालाही काटा रुतत नाही, परंतु चंदु तेथून गेला आणि काटा जरी वाकडा असेल तरी त्याच्या पायात रुतेल. व्यवस्थित शक्ती तर कशी आहे? ज्याला काटा लागायचा असेल त्यालाच लागेल. त्यासाठी सर्व संयोग एकत्र करून देते, परंतु ह्यात निमित्ताचा काय दोष?

जर एखाद्या माणसाने औषधाची फवारणी केल्यामुळे आपल्याला खोकला येत असेल तर त्यासाठी भांडण होईल, परंतु जेव्हा मिरच्यांची फोडणी उडते आणि खोकला येतो तेव्हा कोणी तक्रार करतो का? हे तर जो पकडला जातो त्याच्यावर चिडतात. जर हकीकत समजून घेण्याचा प्रयत्न केला की, करणारा कोण आहे? आणि कशामुळे होत आहे? तर मग भानगड राहील का? बाण मारणाऱ्याची चूक नाही, ज्याला बाण लागला त्याची चूक आहे. बाण मारणारा जेव्हा पकडला जाईल तेव्हा त्याची चूक. आता तर ज्याला बाण लागला तो पकडला गेला आहे. जो पकडला गेला तो पहिला गुन्हेगार आणि दुसरा तर जेव्हा पकडला जाईल तेव्हा त्याची चूक.

## मुलांच्याच चुका काढतात सारे

तुम्हाला शिक्षण घेताना काही अडचणी आल्या होत्या का?

**प्रश्नकर्ता :** अडचणी तर आल्या होत्या.

**दादाश्री :** त्या तुमच्याच चुकीमुळे, त्यात शिक्षकांची किंवा इतर कोणाची चूक नव्हती.

**प्रश्नकर्ता :** ही मुले शिक्षकांच्या विरुद्ध होतात, ते कधी सुधारतील?

**दादाश्री :** जो आपल्या चुकांचा परिणाम भोगतो त्याची चूक. हे गुरुजीच असे आहेत, म्हणून शिष्य विरुद्ध होतात. मुले तर चांगलीच आहेत पण गुरु आणि आई-वडीलच पक्के घनचक्कर आहेत. वडीलधारी

माणसे तर जुनेच धरुन बसतात, मग मुले त्यांचा विरोध करणारच ना? सध्या आई-वडीलांचे चारित्र्य असे नसते की, मुले त्याच्या विरुद्ध होणार नाहीत. ह्यात वडीलधारी माणसांचे चारित्र्य घसरले आहे. आणि म्हणूनच त्यांची मुले त्यांचा विरोध करतात.

## चूकांबद्दल दादांची शिकवण

'भोगतो त्याची चूक' हा सिद्धांत मोक्षाला घेऊन जाईल. कोणी विचारले की मी माझ्या चुका कशा ओळखाव्यात? तेव्हा आम्ही त्याला शिकवतो की तुला जिथे जिथे दु:ख भोगावे लागत आहे, तिथे तुझी चूक आहे. तुझी अशी कोणती चूक झाली असेल की तुला असे भोगायची वेळ आली, हे शोधून काढ. इथे तर संपूर्ण दिवसभर भोगावे लागते, म्हणून शोधून काढायला हवे की कोणकोणत्या चुका झाल्या आहेत.

भोगत असतानाच लक्षात येते की ही आपली चूक आहे. जर कधी आमची चूक झाली, तर आम्हाला टेन्शन येणार ना!

आम्हाला समोरच्याची चूक कशी समजते? तर समोरच्याचे 'होम' (शुद्धात्मा) आणि 'फॉरेन' (अनात्मा) आम्हाला वेगळे दिसतात. समोरच्याच्या फॉरेन भागात चुका झाल्या, गुन्हे झाले तर आम्ही काहीच बोलत नाही, परंतु होममध्ये काही झाले, तर मात्र आम्हाला त्याला जागृत करावे लागते. मोक्षाला जाताना कोणतीही अडचण यायला नको.

आत तर बरीच मंडळी आहे. त्यात कोण भोगत आहे याची आपल्याला जाणीव होते. कधी अहंकार भोगत असतो, तर ती अहंकाराची चूक आहे. कधीतरी मन भोगते, तर ती मनाची चूक आहे. कित्येकदा चित्त भोगते तेव्हा चित्ताची चूक आहे. तेव्हा स्वत:च्या चूकांपासून 'स्वत:' वेगळे राहू शकतो. हे सर्व गोष्ट समजून घ्यावे लागेल ना?

## मूळ चूक कुठे होते?

चूक कोणाची? जो भोगतो त्याची! कोणती चूक? तर 'मी चंदु

आहे' ही मान्यता, हीच तुमची चूक आहे. कारण ह्या जगात कुणीच दोषी नाही, म्हणजेच कोणी गुन्हेगार सुद्धा नाही, असे सिद्ध होते.

बाकी, ह्या जगात कोणी काही करू शकतच नाही. परंतु जो हिशोब होऊन गेला आहे, तो काही सोडणार नाही. जे घोटाळ्याचे हिशोब झाले होते, ते घोटाळ्यावाले फळ दिल्याशिवाय राहणार नाही. आता नव्याने घोटाळे करू नका, आता हे थांबवा. जेव्हापासून हे तुमच्या लक्षात आले, तेव्हापासून थांबा. जे जुने घोटाळे होऊन गेले, ते तर आपल्याला फेडावेच लागतील, परंतु आता नवीन होणार नाहीत ते पाहायचे आहे. संपूर्ण जबाबदारी आपलीच आहे! परमेश्वराची जबाबदारी नाही. परमेश्वर ह्यात हस्तक्षेप करीत नाही. म्हणून परमेश्वर पण त्याला माफ करू शकणार नाही. कित्येक भक्त असे म्हणतात की, 'मी पाप करत आहे आणि परमेश्वर मला माफ करेल.' परमेश्वराजवळ माफी नसते, दयाळू लोकांकडे माफी असते. दयाळू व्यक्तीला सांगितले की, 'साहेब, माझ्याकडून फार मोठी चूक झाली', तर तो लगेच माफ करील.

दु:ख देणारा तर फक्त निमित्त आहे. परंतु मुळात चूक स्वत:चीच असते. जो फायदा मिळवून देतो तोही निमित्त आहे, आणि जो नुकसान करवितो, तोही निमित्तच आहे. पण हा सगळा आपलाच हिशोब आहे, त्यामुळे हे सारे घडत असते.

आम्ही तुम्हाला उघडपणे सांगतो की तुमच्या 'बाउंड्रीत' (हद्दीत) कोणालाही किंचितमात्र दखल करण्याची शक्ती नाही आणि जर तुमची चूक असेल तर कोणीही दखल करू शकेल. अरे, काठीने मारेल सुद्धा! 'आम्ही' तर ओळखून गेलो की कोण ठोसा मारीत आहे. सर्व काही तुमचे स्वत:चेच आहे! तुमचा व्यवहार इत्तर कोणीही बिघडविलेला नाही. तुमचा व्यवहार तुम्हीच बिघडविला आहे. यू आर होल एन्ड सोल रिस्पोन्सिबल फॉर यॉर व्यवहार (तुमच्या व्यवहारासाठी संपूर्णत: तुम्हीच जबाबदार आहात.)

## न्यायाधीश आहे, कंप्युटरसारखा

भोगतो त्याची चूक 'हे गुप्त तत्त्व' आहे. इथे बुद्धी थकून जाते. जिथे मतिज्ञान काम करत नाही ती गोष्ट 'ज्ञानी पुरुषां'कडून उघड होते, 'जशी आहे तशी' स्पष्ट होते. हे गुप्ततत्त्व फार सूक्ष्मपणे समजून घ्यायला हवे. न्याय करणारा चेतन असेल तर तो पक्षपात पण करेल, परंतु जगाचा न्याय करणारा 'निश्चेतन चेतन' आहे. त्याला जगाच्या भाषेत समजायचे असेल तर ते 'कंप्युटर'सारखे आहे. ह्या कंप्युटरमध्ये प्रश्न टाकला तर कंप्युटरची चूक होऊ शकते, परंतु जगाच्या न्यायात कधीच चूक होत नाही. ह्या जगाचा न्याय करणारा 'निश्चेतन चेतन' आहे, आणि तो वीतराग आहे! 'ज्ञानी पुरुषां'चा एकच शब्द नीट समजून घेतला आणि तो आत्मसात केला तर मोक्षालाच जाईल. कोणाचा शब्द? ज्ञानी पुरुषांचा! तेव्हा मग कोणालाही कुणाचा सल्ला घ्यावा लागणार नाही की ह्यात कोणाची चूक आहे? 'भोगतो त्याची चूक.'

हे विज्ञान आहे. संपूर्ण विज्ञान आहे. ह्यात एक अक्षरही चुकीचे नाही. विज्ञान म्हणजे केवळ विज्ञानच आहे. संपूर्ण जगासाठी आहे. हे काही केवळ भारतीय लोकांसाठीच आहे, असे नाही. परदेशात सुद्धा सगळ्यांसाठी आहे!

जेथे असा अगदी स्पष्ट, निर्मळ न्याय, तुम्हाला दाखवून दिला आहे मग न्याय-अन्याय अशी विभागणी करण्याची गरज उरतेच कुठे? ही खूप खोलवरची गोष्ट आहे. सर्व शास्त्रांचे सार मी तुम्हाला सांगत आहे. हे तर 'तेथील' जजमेन्ट (न्याय) कशा प्रकारे चालते, ते अगदी एक्झॅक्ट सांगत आहोत की 'भोगतो त्याची चूक.' आमच्याकडून 'भोगतो त्याची चूक' हे सूत्र अगदी एक्झॅक्ट निघाले आहे! ह्याचा जो वापर करेल त्याचे कल्याणच होऊन जाईल!

**जय सच्चिदानंद**

# दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित मराठी पुस्तकें

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण (सं)
9. भावना सुधारे जन्मोजन्म
10. कर्माचे विज्ञान
11. पाप-पुण्य
12. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार (सं)
13. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार (सं)
14. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य (सं)
15. मानव धर्म
16. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
17. सेवा-परोपकार
18. दान
19. त्रिमंत्र
20. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
21. चमत्कार
22. सत्य-असत्याचे रहस्य
23. वाणी, व्यवहारात (सं)
24. पैशांचा व्यवहार (सं)
25. क्लेश रहित जीवन
26. निजदोष दर्शनाने... निर्दोष!
27. प्रेम
28. गुरू-शिष्य
29. अहिंसा
30. आप्तवाणी-1, 2, 3
31. जगत कर्ता कोण?
32. कर्माचा सिद्धांत

## हिन्दी

1. आत्मसाक्षात्कार
2. ज्ञानी पुरुष की पहचान
3. सर्व दु:खों से मुक्ति
4. कर्म का सिद्धांत
5. आत्मबोध
6. मैं कौन हूँ?
7. पाप-पुण्य
8. भुगते उसी की भूल
9. एडजस्ट एवरीव्हेयर
10. टकराव टालिए
11. हुआ सो न्याय
12. चिंता
13. क्रोध
14. प्रतिक्रमण (सं, ग्रं)
16. दादा भगवान कौन ?
17. पैसों का व्यवहार (सं, ग्रं)
19. अंत:करण का स्वरूप
20. जगत कर्ता कौन ?
21. त्रिमंत्र
22. भावना से सुधरे जन्मोंजन्म
23. चमत्कार
24. प्रेम
25. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (सं, पू, उ)
28. दान
29. मानव धर्म
30. सेवा-परोपकार
31. मृत्यु समय, पहले और पश्चात्
32. निजदोष दर्शन से... निर्दोष
33. पति-पत्नी का दिव्य व्यवहार (सं)
34. क्लेश रहित जीवन
35. गुरु-शिष्य
36. अहिंसा
37. सत्य-असत्य के रहस्य
38. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
39. माता-पिता और बच्चों का व्यवहार (सं)
40. वाणी, व्यवहार में... (सं)
41. कर्म का विज्ञान
42. सहजता
43. आप्तवाणी - 1 से 9
52. आप्तवाणी - 13 (पूर्वार्ध व उत्तरार्ध)
54. आप्तवाणी - 14 (भाग-1, 2)
56. ज्ञानी पुरुष (भाग-1)

**( सं - संक्षिप्त, ग्रं - ग्रंथ, पू - पूर्वार्ध, उ - उत्तरार्ध )**

**★ दादा भगवान फाउन्डेशन द्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहे। वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता।**

**★ प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि अंग्रेजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित करीत आहे।**

## संपर्क सूत्र

### दादा भगवान परिवार


**अडालज** : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे,
पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421
**फोन** : 9328661166, 9328661177
E-mail : info@dadabhagwan.org

**मुंबई** : **त्रिमंदिर,** ऋषिवन, काजुपाडा, बोरिवली (E)
फोन : 9323528901

| | | | |
|---|---|---|---|
| **दिल्ली** | 9810098564 | **बेंगलूर** | 9590979099 |
| **कोलकता** | 9830080820 | **हैदराबाद** | 9885058771 |
| **चेन्नई** | 7200740000 | **पूणे** | 7218473468 |
| **जयपुर** | 8890357990 | **जलंधर** | 9814063043 |
| **भोपाल** | 6354602399 | **चंडीगढ** | 9780732237 |
| **इन्दौर** | 6354602400 | **कानपुर** | 9452525981 |
| **रायपुर** | 9329644433 | **सांगली** | 9423870798 |
| **पटना** | 7352723132 | **भुवनेश्वर** | 8763073111 |
| **अमरावती** | 9422915064 | **वाराणसी** | 9795228541 |

**U.S.A.** : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232),
**Email :** info@us.dadabhagwan.org

**U.K.** : +44 330-111-DADA (3232)

**Kenya** : +254 722 722 063

**UAE** : +971 557316937

**Dubai** : +971 501364530

**Australia** : +61 421127947

**New Zealand** : +64 21 0376434

**Singapore** : +65 81129229


**www.dadabhagwan.org**



## भोगतो त्याची चूक

'हा खिसा कापला, त्यात चूक कोणाची ? ह्याचा खिसा कापला गेला नाही आणि तुझाच का कापला गेला ? तुमच्या दोघात सध्या कोण भोगत आहे ?' 'भोगतो त्याची चूक.'

'भोगतो त्याची चूक' हा सिद्धांत मोक्षाला घेऊन जाईल. जर कोणी विचारले की 'मी माझ्या चुका कशा ओळखू ?' तेव्हा आम्ही त्याला समजावतो की, 'तुला जिथे-जिथे दु:ख भोगावे लागत आहे, तिथे तुझीच चूक आहे. तुझी अशी कोणती चूक झाली असेल, की असे भोगायची वेळ आली, ते तू शोधून काढ.' हे तर दिवसभर भोगावे लागत आहे. म्हणून शोधून काढायला हवे की कोणकोणत्या चुका झाल्या आहेत.

आपण आपल्याच चुकांमुळे बांधले गेलो आहोत. लोकांनी आपल्याला बांधलेलेच नाही. चूक सुधारली की झालो मुक्त !

– दादाश्री

मूल दीपक से प्रकटे दीपमाला

dadabhagwan.org

ISBN 978-93-86289-81-0

Printed in India

Price ₹20